# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 13 February 2025
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.

****

- पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यासाठी वॉशिंग्टनमध्ये दाखल.
- आशियातल्या सर्वात मोठ्या मुंबई टेक वीक २०२५ या 'एआय' महोत्सवाची मुख्यमंत्र्यांची घोषणा.
- स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासंबंधी टाटा स्मारक केंद्राकडून जनुकीय कारणांचा शोध.
- क्रिकेटमध्ये भारतीय संघाचा इंग्लंडवर तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात दणदणीत विजय.

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत ५० सुवर्णपदकांसह महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसीय अमेरिका दौऱ्यासाठी वॉशिंग्टनमध्ये दाखल झाले. भारतीय समुदायाकडून त्यांचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं. पंतप्रधानांनी आज अमेरिकेच्या अन्वेषण विभागाच्या प्रमुख तुलसी गाबार्ड यांची भेट घेतली. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी, भारत-अमेरिका द्विपक्षीय संबंधाला चालना देण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अमेरिकी उद्योजकांच्या भेटी घेणार आहेत.

****

आशियातल्या सर्वात मोठ्या मुंबई टेक वीक २०२५ या 'एआय' महोत्सवाची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. टेक आंत्रप्रेन्योअर्स असोसिएशन ऑफ मुंबई, अर्थात टीम सोबत काल झालेल्या विशेष बैठकीत त्यांनी तंत्रज्ञान क्षेत्राला चालना देण्यासाठी शासन सर्वतोपरी मदत करेल अशी ग्वाही दिली.

या महोत्सवाच्या माध्यमातून मुंबईला ‘आशियाचा AI सँडबॉक्स’ म्हणून जागतिक स्तरावर स्थान मिळवून देण्याचा संकल्प मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. या महोत्सवातून ‘एआय’ तंत्रज्ञानाचा व्यावसायिक वापर, भारतीय ‘एआय’ संशोधन, आणि उद्योजकांसाठी गुंतवणूक उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

****

लाडकी बहीण योजना कधीही बंद पडणार नाही, या योजनेत यापेक्षा अधिक मदत करण्याचा विचार सुरू असल्याचं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या घाटंजी इथल्या घरकाम करणाऱ्या २० महिलांनी रसिकाश्रय या संस्थेमार्फत "जीवाची मुंबई, श्रमाची आनंदवारी" या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्र्यांची काल भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते. गोरगरीब जनतेचं जीवन सुसह्य करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोडणी मजुरांच्या संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना अधिक लाभ मिळावा, यासाठी, ऊस तोडणी यंत्रासाठीच्या अनुदान योजनेचा सुधारित प्रस्ताव राज्य शासनानं केंद्र शासनाला सादर करावा, असे निर्देश केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले आहेत. काल नवी दिल्लीत यासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. राज्यातल्या २५७ पात्र लाभार्थ्यांनी या योजनेतून ऊस तोडणी यंत्राची खरेदी केली असून, त्यापैकी १४१ लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या हिश्श्याची रक्कम वितरीत करावी, अशी विनंती कृषी मंत्री कोकाटे यांनी यावेळी केली.

****

टाटा स्मारक केंद्र आणि नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बायोमेडिकल जीनोमिक्स यांनी, स्तनाच्या कर्करोगाच्या काही रुग्णांकडून हार्मोन उपचारांना प्रतिसाद न मिळण्यामागची जनुकीय कारणं शोधून काढली आहेत. या शोधामुळे अशा रुग्णांसाठीची उपचार योजना ठरवण्यात मदत मिळणार आहे. या शोधात, रुग्णांच्या ट्यूमरमधल्या तीन प्रमुख जनुकांमध्ये उत्परिवर्तन आढळलं. हा शोध म्हणजे कर्करोगाच्या वैयक्तिकृत उपचारांमधलं एक महत्त्वाचं मार्गदर्शक पाऊल आहे, असं प्रमुख संशोधक डॉ. निधान बिस्वास यांनी सांगितलं.

****

राज्यात गोड्या पाण्यातलं तसंच समुद्रातलं मत्स्योत्पादन वाढवण्यासाठी मच्छिमारांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी घेतला आहे. मंत्रालयात काल यासंदर्भात झालेल्या बैठकीत ते बोलत होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर या प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबवण्याचे, तसंच या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जिल्ह्यांच्या नियोजन समितीच्या निधीमधून तरतूद करण्याचे निर्देश राणे यांनी दिले.

****

राजकीय पक्षांनी निवडणुकीपूर्वी मोफत वस्तू द्यायच्या घोषणा करण्याच्या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. मोफत वस्तूंची सवय लागली तर लोक काम करणार नाहीत, असं न्यायालयाने म्हटलं आहे. नागरी भागात बेघर लोकांच्या निवाऱ्याच्या हक्का संदर्भात न्यायमूर्ती बी आर गवई आणि ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांच्या पीठासमोर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने ही टिप्पणी केली. निवारा देण्याचा हेतू चांगला आहे, मात्र त्यांना मुख्य प्रवाहात सामील करून घेणं जास्त योग्य होणार नाही का, असा प्रश्न न्यायालयाने सरकारला यावेळी विचारला.

****

जागतिक रेडिओ दिवस आज साजरा केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर इथले संगीत रसिक संजय पवार यांनी जगभरातल्या रेडिओंसोबतच अनेक ग्रामोफोन आणि संगीताच्या दोन हजाराहून अधिक तबकड्यांचा संग्रह केला आहे. आपल्या या संग्रहाचं आज सर्वसामान्यांसाठी प्रदर्शन भरवल्याचं पवार यांनी सांगितलं….

> ***मी एक रेडिओ प्रेमी आहे. जुन्या काळापासून आजपर्यंतची जेवढे काही रेडिओ आणि संगीत साधने जेवढी काही आहेत, तो संग्रह माझ्याकडे आहे. माझ्याकडे १९४० पासून ते आजपर्यंतचे रेडिओ आहेत. रेडिओचे जेवढे व्हर्जन्स निघाले, सुरवातीला वॉल रेडिओ निघाले, नंतर ट्रान्झीस्टर्स निघाले, त्यानंतर पॉकेट रेडिओ, टेबल रेडिओ निघाले त्या सगळ्या रेडिओचा मी संग्रह केलेला आहे. म्हणून माझं रेडिओ प्रसार आणि प्रसार व्हावा यासाठी मी खुलं प्रदर्शन ठेवलेलं आहे.***

सिडको एन आठमध्ये वेणुताई चव्हाण शाळेजवळ अमर हाऊसिंग सोसायटीत पवार यांच्या राहत्या घरी, दुपारी तीन वाजेपासून हे प्रदर्शन सर्वांना पाहता येणार आहे.

****

क्रिकेटमध्ये इंग्लंडचा १४२ धावांनी दणदणीत पराभव करत, भारतानं तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतले सर्व सामने जिंकत निर्भेळ विजय मिळवला आहे. काल अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत ३५६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल खेळण्यास उतरलेला पाहुणा संघ ३५ व्या षटकांत २१४ धावांवर सर्वबाद झाला. १४ चौकार आणि तीन षटकारांच्या बळावर ११२ धावा करणारा शुभमन गील सामनावीर तसंच मालिकावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र १७५ पदकांसह दुसऱ्या स्थानावर कायम आहे. यामध्ये ५० सुवर्ण, ६२ रौप्य आणि ६३ कांस्य पदकांचा समावेश आहे. सेना दलं ६५ सुवर्ण पदकांसह पहिल्या, तर ३९ सुवर्ण पदकांसह हरियाणा तिसऱ्या स्थानावर आहे.

काल या स्पर्धेत ४०० मीटर अडथळा शर्यतीत महाराष्ट्राच्या नेहा धाबळे हिनं कांस्यपदक, तर संजीवनी जाधव हिनं रौप्य पदक जिंकलं. मिश्र रिले स्पर्धेत राज्याच्या संघाने रौप्य पदक पटकावलं.

****

धाराशिव जिल्ह्याच्या कळंब तालुक्यात शेळका धानोरा इथले महादेव विठ्ठल कांबळे यांच्या शेतात एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्तेच्या वापरातून मिरची पिकाचं संगोपन केलं जात आहे. सयाजी ॲग्रो प्रोड्युसर कंपनीने आयसीआयसीआय फाउंडेशनकडून वापरात आणलेल्या या आधुनिक तंत्रज्ञानाचा आढावा घेणारा हा वृत्तांत..

***शेतात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पिकांच्या वाढीसाठी जमिनीमध्ये असलेली आर्द्रता, हवामानाचा परिणाम, औषध फवारण्या तसेच पाण्याचे व्यवस्थापन आणि पीक व्यवस्थापन करण्यास मदत होत आहे. यासाठी जमिनीमध्ये वाफे पद्धतीने लावलेल्या मिरच्यांच्या मुळाशी सेंसर लावून ते सेंसर संदेश टॉवर पर्यंत पोहोचतात, हा टॉवर २४ तास कार्यरत राहून संबंधित शेतकऱ्याला त्याच्या मोबाईलवर संदेशाद्वारे अवगत केलं जातं. त्यामुळे पिकांची जोपासना करण्यास आणि शेती उत्पादन वाढण्यास मदत होणार***

***आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा केलेला हा वापर हा धाराशिव जिल्ह्यातील पहिलाच पथदर्शी प्रयोग असून इतर शेतकऱ्यांना हा मार्गदर्शक ठरणार आहे.***
***देविदास पाठक, आकाशवाणी वार्ताहर, धाराशिव.***

****

चव्वेचाळीसावं मराठवाडा साहित्य संमेलन येत्या पंधरा आणि सोळा तारखेला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात वाळूज इथं आयोजित करण्यात आलं आहे. दगडोजीराव देशमुख महाविद्यालयात आयोजित संमेलनाचं अध्यक्षपद डॉ. भीमराव वाघचौरे भूषवणार असल्याची माहिती, काल पत्रकार परिषदेत देण्यात आली.

****

हिंगोली जिल्ह्यात आरोग्य शिबिरं घेऊन सगळ्या सफाई कर्मचाऱ्यांची नि:शुल्क आरोग्य तपासणी पूर्ण करावी, अशी सूचना राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी. पी. वावा यांनी केली आहे. काल हिंगोली इथं आयोगाच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सफाई कर्मचाऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली, तसंच कर्मचाऱ्यांना आभा कार्डचं वितरण करण्यात आलं.

****

परभणी इथं कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या प्रकरणाची चौकशी उच्च न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींमार्फत करावी, तसंच संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करावं, अशी मागणी, काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे अध्यक्ष सिद्धार्थ हत्तीअंबिरे यांनी केली आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या मागण्या मान्य न केल्यास येत्या तीन मार्चला मंत्रालयाला घेराव घालण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातल्या आखाडा बाळापूर इथले प्रतिष्ठित व्यापारी तथा युवा सामाजिक कार्यकर्ते सचिन पेंढारकर यांना या वर्षाचा 'राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. येत्या नऊ मार्च रोजी हिंगोली इथं हा पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान केला जाणार आहे.

****

बीड नगरपालिकेनं काल शहरातल्या अनेक भागातली अतिक्रमणं निष्कासित केली. मुख्याधिकारी नीता अंधारे या स्वतः पूर्ण पथकासह या कारवाईत सहभागी झाल्या होत्या.

****

महाकुंभमेळ्यासाठी प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी दक्षिण मध्य रेल्वे विशेष गाड्या चालवणार आहे. नांदेड-पाटणा-नांदेड ही गाडी आज रात्री ११ वाजता नांदेड इथून निघेल तर परतीच्या प्रवासात पाटणा इथून पंधरा तारखेला निघेल.

****